साप्ताहिक
# तेरणा वृत्तांत

धाराशिव | अंक – ३६ | सोमवार, १८ मे २०२६ | RNI NO. MHMAR/25/A0338 | वर्ष – १ | पाने ४ | किंमत ५ रुपये

# ‘पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियाना’तून संघटन बळकटीवर भर

## उदगीरमध्ये भाजपचे प्रशिक्षण शिबिर; पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

**लातूर : उदगीर येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने ‘पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान’ अंतर्गत धाराशिव जिल्हा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासोबतच कार्यकर्त्यांमध्ये वैचारिक स्पष्टता, संघटनात्मक शिस्त आणि जनसंपर्क कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने हा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले होते.**





या प्रशिक्षण वर्गामध्ये भारतीय जनता पार्टीची कार्यपद्धती, संघटन रचना, बूथस्तरीय नियोजन, प्रभावी संवादकौशल्य, सोशल मीडियाचा वापर तसेच समाजाशी सातत्याने संपर्क ठेवण्याच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. ‘राष्ट्र प्रथम’ या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून कार्यकर्त्यांना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचे आणि विकास योजनांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले.

प्रशिक्षण वर्गात खासदार धनंजय महाडिक, आमदार राणाजगजितसिंह पाटील, तसेच पुनित जोशी आणि मनोज पांगरकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. विविध सत्रांमधून पक्षविस्तार, जनतेशी संवाद वाढवण्याचे तंत्र, संघटन मजबुतीकरण आणि समाजाभिमुख कार्य याविषयी माहिती देण्यात आली. आगामी काळात जनसंपर्क अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी स्थानिक पातळीवर सक्रिय राहण्याची आवश्यकता वक्तृयांनी अधोरेखित केली.

भारतीय जनता पार्टीकडून देशभरात ‘पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६’ राबवले जात असून, बूथ ते जिल्हा स्तरावरील कार्यकर्त्यांना वैचारिक आणि संघटनात्मक प्रशिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. विविध राज्यांमध्ये आयोजित प्रशिक्षण कार्यशाळांमध्ये डिजिटल संवाद, संघटन व्यवस्थापन आणि समाजकार्य यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत असल्याची माहिती उपलब्ध आहे.

उदगीर येथे संपन्न झालेल्या या प्रशिक्षण वर्गात कार्यकर्त्यांचा उत्साह लक्षणीय दिसून आला. विविध सत्रांमध्ये प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. समाजहिताची जाणीव, संघटनात्मक जबाबदारी आणि नागरिकांशी सातत्यपूर्ण संवाद या बाबींवर भर देण्यात आला. जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांमुळे शिबिराला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

या प्रशिक्षण वर्गास माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष अर्चना पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अर्चना पाटील चाकुरकर, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, धाराशिव नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, अनिल काळे, सुनील चव्हाण यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


राणाजगजितसिंह पाटील
विधानसभा सदस्य
महाराष्ट्र
जा. क्र. राप/प्र.भ.का/2026/01243
दिनांक: 14/05/2026
विषय:- खरीप 2025 हंगामातील सोयाबीन पिकाचा विमा तातडीने वितरीत करण्याबाबत आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीला निर्देशीत करणे बाबत.
महोदय,
खरीप 2025 हंगामातील सोयाबीन पिकांच्या पिक कापणी प्रयोगाबाबत आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीने जिल्हास्तरीय समितीच्या आदेश विरुद्ध राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समितीकडे केलेले अपील फेटाळण्यात आले आहे. राज्यस्तरीय समितीने विमा कंपनीला "settle all eligible claims immediately" असे आदेश दिले आहेत.
तरी त्याअनुषंगाने कृषी विभागाकडुन मला प्राप्त माहिती नुसार शेतकऱ्यांना रु.336 कोटी विमा वितरत करणे अपेक्षीत असुन आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीला तातडीने शेतकऱ्यांना सदरील रक्कम वितरीत करण्याचे निर्देश द्यावेत, ही विनंती.
राणाजगजितसिंह पाटील
प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
धाराशिव.
जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव
दिनांक 14 MAY 2026

# खरीप २०२५ पीकविमा; ₹३३६ कोटी वितरित करण्याचे आदेश

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्रानंतर जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई

**धाराशिव :** जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांचे खरीप २०२५ ची ३३६ कोटींची पीक विमा रक्कम तात्काळ वितरित करण्याचे आदेश विमा कंपनीला देण्यात आले आहे.विमा कंपनीने पीक कापणी प्रयोगांवर घेतलेले आक्षेप राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने (STAC) फेटाळून लावले, त्यानंतर धाराशिवाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी विमा कंपनीला पात्र शेतकऱ्यांचे दावे तात्काळ निकाली काढण्याचे कठोर आदेश दिले आहेत. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिलेल्या पत्रानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने वरील आदेश बजावले आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप २०२५-२६ वर्षात धाराशिव जिल्ह्यातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीनसाठी एकूण ५०४ पीक कापणी प्रयोगांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र,विमा कंपनीने यातील तब्बल ३६८ प्रयोगांवर चुकीच्या पद्धतीने प्लॉट निवड, स्थानिक दबाव आणि प्रक्रियात्मक त्रुटी असल्याचा दावा करत आक्षेप नोंदवले होते. या आक्षेपांवर जिल्हास्तरीय सुकाणू समितीने (DLSC) सविस्तर सुनावणी घेतली.

मुदतीनंतर दाखल करण्यात आलेले १४९ आक्षेप थेट नामंजूर करण्यात आले, तर उर्वरित २१७ प्रयोगांपैकी केवळ १७ प्रयोगांमधील आक्षेप वैध धरून ते प्रयोग रद्द करण्यात आले. उर्वरित २०० आक्षेप समितीने फेटाळले. जिल्हास्तरीय आढावा समितीने देखील हा निर्णय कायम ठेवला होता. यानंतर विमा कंपनीने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे अपील दाखल केले होते.



१४ एप्रिल २०२६ रोजी कृषी सचिव परिमल सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन सुनावणीत कृषी आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाने कंपनीचे दावे ठोसपणे खोडून काढले. सुनावणीदरम्यान विमा कंपनीने मैदानी पातळीवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले नसल्याचे तसेच कंपनीचे प्रतिनिधी प्रयोगस्थळी उशिरा पोहोचत असल्याचे निदर्शनास आले.

अखेर १० मे २०२६ रोजी राज्य समितीने दिलेल्या आदेशात, विमा कंपनीने उपस्थित केलेला वाद कोणत्याही तथ्यात्मक अथवा कायदेशीर आधाराविना असून तो ग्राह्य धरण्यासारखा नाही, असे स्पष्ट नमूद करत कंपनीचे अपील फेटाळून लावले. त्याचबरोबर सर्व पात्र दावे तात्काळ निकाली काढा, असे स्पष्ट निर्देशही विमा कंपनीला देण्यात आले होते. राज्य समितीच्या या निर्णयानंतर आपण स्वतः जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पत्र देऊन तातडीने विमा रक्कम वितरित करण्याबाबत कंपनीला आदेशित करण्याची मागणी केली होती.

त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी १४ मे रोजी विमा कंपनीला आदेश जारी करत कृषी आयुक्तालय आणि ‘YESTECH’ कडून उपलब्ध झालेल्या उत्पादनाच्या आकडेवारीनुसार पात्र शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाईची रक्कम कोणतीही दिरंगाई न करता तत्काळ वितरित करण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी करण्यात टाळाटाळ झाल्यास तो कंपनीचा जाणीवपूर्वक निष्काळजीपणा मानून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**विमा रक्कम प्राप्त होइपर्यंत पाठपुरावा करणार**

कृषी विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्ह्यातील बाधित सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सुमारे ३३६ कोटी रुपयांचा पीक विमा मिळणे अपेक्षित असून, ही रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी प्रशासनाने विमा कंपनीला कठोर निर्देश द्यावेत, अशी मागणी आपण केली आहे. मागील अनेक महिन्यांपासून विमा भरपाईच्या प्रतीक्षेत असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी हा निर्णय मोठा दिलासा मानला जात आहे.

राज्य समितीचा निर्णय, जिल्हाधिकाऱ्यांचे कठोर आदेश आणि आपण केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे आता पीक विमा वितरणाचा मार्ग मोकळा झाला असून, शेतकऱ्यांना विमा रक्कम प्राप्त होईपर्यंत आपला पाठपुरावा सुरू असेल,तसेच विमा कंपनीने या निर्णयाला विरोध करत राज्य समितीकडे अपील केले तर त्यासाठी आवश्यक ती तयारी ठेवण्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.




# जिल्ह्यासाठी ८४ हजार लिटर केरोसिन मंजूर

## पहिला टँकर दाखल, पुरवठ्यास सुरुवात

**धाराशिव :** सद्यस्थितीत भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजीचा तुटवडा जाणवत असल्याने केंद्र शासनाने दि.१२ मार्च २०२६ रोजीच्या आदेशान्वये राज्यासाठी ३७४४ किलो लिटर केरोसिन नियतन मंजूर केले आहे. त्यानुषंगाने राज्य शासनाकडून धाराशिव जिल्ह्यासाठी ८४ किलो लिटर केरोसिन नियतन मंजूर करण्यात आले आहे.

धाराशिव जिल्ह्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या ८४ हजार लिटर केरोसिनचे तालुकानिहाय वाटप अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभ योजना शिधापत्रिकाधारकांसाठी सर्वसाधारण प्रमाणात निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार धाराशिव तालुक्यास २० हजार लिटर, तुळजापूरला ११ हजार लिटर, लोहारा ७ हजार लिटर, उमरगा १३ हजार लिटर,परंडा ९ हजार लिटर,भूम ८ हजार लिटर, कळंब ११ हजार लिटर आणि वाशी तालुक्यास ५ हजार लिटर केरोसिनचे नियतन देण्यात आले आहे.

दरम्यान, मंजूर करण्यात आलेल्या ८४ हजार लिटरपैकी १२ हजार लिटरचा पहिला टँकर आज १३ मे रोजी जिल्ह्यात दाखल झाला असून, धाराशिव तालुक्यापासून केरोसिन पुरवठ्यास सुरुवात करण्यात येणार आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती. स्वाती शेंडे यांनी केरोसिन टँकरला जिल्हाधिकारी कार्यालय येथे हिरवा झेंडा दाखवून जिल्ह्यातील केरोसिन वाटपाचा शुभारंभ केला.

जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना हे केरोसिन प्रति लिटर ६३ रुपये दराने उपलब्ध होणार असून, प्रति कार्ड ३ लिटरप्रमाणे वितरण करण्यात येणार आहे. हे नियतन प्राधान्याने अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना आणि त्यानंतर प्राधान्य कुटुंब लाभ योजना शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

धाराशिव तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांनी आपल्या केरोसिन किंवा रास्तभाव दुकानदारांकडे जाऊन केरोसिन खरेदी करावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# NEET पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रातील पाच आरोपींना अटक ; CBI चा तपास वेगात

**मुंबई : देशभरात गाजत असलेल्या NEET पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (CBI) तपासाची व्याप्ती वाढवत आतापर्यंत नऊ जणांना अटक केली आहे. यातील पाच आरोपी महाराष्ट्रातील असल्याने राज्यातही मोठी खळबळ उडाली आहे. पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर या भागांमधून आरोपींना अटक करण्यात आली असून या प्रकरणातील तपास दिवसेंदिवस गंभीर वळण घेत आहे.**



NEET-UG २०२६ ही वैद्यकीय शिक्षणासाठीची राष्ट्रीय प्रवेश परीक्षा ३ मे २०२६ रोजी घेण्यात आली होती. मात्र, परीक्षेतील प्रश्नपत्रिका परीक्षा होण्यापूर्वीच बाहेर फुटल्याचे समोर आल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेली ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) ने १० मे रोजी घेतला. आता ही परीक्षा २१ जून २०२६ रोजी पुन्हा घेतली जाणार आहे.

या प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने १२ मे रोजी उइख कडे लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर CBI ने गुन्हा नोंदवत देशभरात तपास सुरू केला. गुन्हेगारी कट, फसवणूक, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा तसेच सार्वजनिक परीक्षा कायद्यातील विविध कलमांनुसार ऋखठ दाखल करण्यात आली आहे.

CBI च्या तपासात आतापर्यंत केमिस्ट्री आणि बायोलॉजी विषयांचे पेपर लीक झाल्याचे उघड झाले आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर, दिल्ली, जयपूर आणि गुरुग्राम येथून आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांपैकी काहींना न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

**महाराष्ट्रातील आरोपी कोण?**

या प्रकरणात महाराष्ट्रातून अटक करण्यात आलेल्यांमध्ये पुण्यातील पी. व्ही. कुलकर्णी, मनीषा मांढरे, मनिषा वाघमारे, नाशिकमधील शुभम खैरनार आणि अहिल्यानगरमधील धनंजय लोखंडे यांचा समावेश आहे.

**पी. व्ही. कुलकर्णी ‘मुख्य सूत्रधार’?**

CBI ने पुण्यातील प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी उर्फ पी. व्ही. कुलकर्णी यांना या प्रकरणातील मुख्य सूत्रधार म्हटले आहे. लातूरमधील दयानंद महाविद्यालयात केमिस्ट्रीचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ते २०२२ मध्ये निवृत्त झाले होते. त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण वर्ग चालवले.

CBI च्या माहितीनुसार, कुलकर्णी यांचा NTA च्या परीक्षा प्रक्रियेशी संबंध होता. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सांगण्यात आलेले प्रश्न आणि उत्तरे ही NEET परीक्षेतील प्रश्नांशी जुळल्याची माहिती समोर आली आहे.

**मनिषा वाघमारेची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात:**

मनिषा वाघमारे यांना १४ मे रोजी अटक करण्यात आली. उइख च्या तपासानुसार, त्यांनी पी. व्ही. कुलकर्णी यांना विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या विशेष वर्गांमध्ये मदत केली होती. या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांनी वहीत लिहून घेतलेले प्रश्न नंतर परीक्षेतील प्रश्नपत्रिकेशी जुळल्याचे समोर आले.

**प्राध्यापिका मनीषा मांढरे अटकेत :**

पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात वनस्पतिशास्त्राच्या वरिष्ठ प्राध्यापिका असलेल्या मनीषा मांढरे यांनाही CBI ने अटक केली आहे. त्या NEET-UG २०२६ च्या प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत तज्ज्ञ म्हणून सहभागी होत्या. त्यांना बॉटनी आणि झूलॉजी विषयांच्या प्रश्नपत्रिकांपर्यंत प्रवेश असल्याचे तपासात समोर आले आहे. CBI ने चौकशी केल्यानंतर त्यांना दिल्लीमध्ये अटक करण्यात आली आणि त्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले.

**नाशिकचा शुभम खैरनार चर्चेत :**

नाशिकमधील शुभम खैरनार हे नाव या प्रकरणात सर्वप्रथम चर्चेत आले. टेलिग्राम ग्रुपवरून प्रश्नपत्रिका फॉरवर्ड केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. पोलिसांनी १२ मे रोजी त्याला ताब्यात घेतल्यानंतर पुढील तपासासाठी उइख कडे सोपवले.

माहितीनुसार, शुभम खैरनारने धनंजय लोखंडेकडून मिळालेली प्रश्नपत्रिका इतर काही जणांना पाठवली होती. तो नाशिकमध्ये SR एज्युकेशन कन्सल्टन्सी नावाने व्यवसाय करत होता. त्याच्या कार्यालयाच्या फलकावर ‘डॉ. शुभम खैरनार’ असा उल्लेख आढळून आला होता. दरम्यान, तो वैद्यकीय शिक्षण घेत असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, संबंधित विद्यापीठ प्रशासनाने त्याने अभ्यासक्रम पूर्ण केला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

**धनंजय लोखंडेकडून पेपर पुरवठा?**

अहिल्यानगरमधून अटक करण्यात आलेल्या धनंजय लोखंडे याने मनिषा वाघमारे यांच्याकडून NEET परीक्षेसंदर्भातील माहिती मिळवून ती शुभम खैरनारला दिल्याचा आरोप आहे. शुभम आणि धनंजय एकमेकांच्या संपर्कात असल्याचे तपासात समोर आले आहे.

दरम्यान, या सर्व आरोपींकडून किंवा त्यांच्या वकिलांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. CBI कडून तपास सुरू असून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शेतकऱ्यांना मोफत गाळ; सीसीटिव्ही, जीपीएस- जीओ फेन्सिंगद्वारे नियंत्रण

**मुंबई : राज्यातील धरणांच्या जलाशयांतील वाढता गाळ, कमी होत चाललेला पाणीसाठा क्षमता आणि अनियंत्रित वाळू उपशाच्या पार्श्वभूमीवर सहा मोठ्या प्रकल्पांच्या जलाशयातून प्रायोगिक तत्वावर गाळ व गाळिमश्रित वाळू काढण्यास व त्याबाबतच्या सुधारित धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.**

## पाटबंधारेच्या सहा प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ काढण्यात येणार

या धोरणामुळे प्रकल्पांतील पाणीसाठा वाढणार असून, शेतकऱ्यांना सुपीक गाळ उपलब्ध होणार आहे. तसेच धरणांच्या जतन - संवर्धनाच्या दृष्टीने हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे. प्रायोगिक तत्वावर गाळ काढण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये उजनी, गिरणा, गोसीखुर्द, मुळा, जायकवाडी आणि हतनूर धरण या प्रकल्पांचा समावेश आहे.

नव्या धोरणानुसार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना ही कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व दुरुस्ती कामांसाठी वापरला जाणार आहे.

या निर्णयातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे धरणांमधून काढण्यात येणारा गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात टाकण्यासाठी पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी फक्त वाहतूक खर्च करायचा असून कोणतेही स्वामित्व शुल्क आकारले जाणार नाही. यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे.

गाळाच्या परिमाणानुसार निविदांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ५० दशलक्ष घनमीटरपर्यंत गाळ असल्यास ५ वर्षे, ५० ते १०० दशलक्ष घनमीटरसाठी ७ वर्षे आणि



१०० दशलक्ष घनमीटरपेक्षा अधिक गाळ असल्यास १० वर्षांचा कालावधी असेल.

नव्या धोरणात वाळू चोरी आणि अनियमितता रोखण्यासाठी कडक तांत्रिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गाळिमश्रित वाळूपासून वेगळी करण्यात आलेली वाळू साठवणूक क्षेत्र जीओ फेन्सिंग अंतर्गत राहणार असून तेथे 24x7 सीसीटीव्ही देखरेख बंधनकारक असेल. वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक राहील. वाहनांचे ई-पास, बारकोड प्रणाली आणि ऑनलाईन नोंदी ठेवण्याची सक्ती करण्यात आली आहे.

जलाशयातून केवळ वाळू उपसा करता येणार नाही. गाळ आणि वाळू दोन्ही काढणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच नैसर्गिक जमिनीच्या पातळीखाली दोन फुटांपेक्षा अधिक उत्खनन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

पर्यावरणीय बाबींनाही या धोरणात महत्त्व देण्यात आले आहे. पर्यावरण विभागाची परवानगी, राज्य तज्ञ मूल्यमापन समिती आणि राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाची मान्यता, तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या सस्टेनेबल सँड मायनिंग मॅनेजमेंट गाईडलाईन्स २०१६ आणि एन्फोर्समेंट अँड मॉनिटरिंग फॉर सँन्ड मायनिंग २०२० मधील निकषांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

जलाशयांच्या पृष्ठभागावर भविष्यात सौरऊर्जा प्रकल्प, पर्यटन, जलक्रीडा किंवा जलविद्युत प्रकल्प उभारण्यास अडथळा निर्माण होणार नाही, अशी अटही करारामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील धरणांची पाणीसाठवण क्षमता वाढणे, सिंचन कार्यक्षमता सुधारणे, शेतजमिनींची सुपीकता वाढणे आणि वाळू उत्खनन प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे.



# तेरणा वृत्तांत संपादकीय

## मध्यपूर्वेतील युद्ध आणि भारताची परीक्षा

भारत सध्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या, युद्धजन्य परिस्थितीच्या आणि वाढत्या महागाईच्या आव्हानातून जात आहे. मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य तणावाने आता भारतासारख्या विकसनशील देशांनाही थेट फटका बसू लागला आहे. स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ या जगातील सर्वात महत्त्वाच्या तेलवाहतूक मार्गावर निर्माण झालेला पेच केवळ प्रादेशिक प्रश्न राहिलेला नाही; तो जागतिक अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. अमेरिका - इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर अनिश्चिततेचे सावट आले आहे. भारतासारखा देश, जो आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करतो, त्याच्यासाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे.

अशा वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केलेले ङ्गइंधन वाचवा, अनावश्यक सोने खरेदी टाळा, वर्क फ्रॉम होम कराङ्ख हे आवाहन केवळ सल्ले नाहीत, तर देशाच्या आर्थिक सुरक्षेसाठी दिलेला इशारा आहे. सामान्यतः अशा आवाहनांकडे राजकीय भाषण म्हणून पाहिले जाते; मात्र यामागे जागतिक अर्थकारणाचे गंभीर वास्तव दडलेले आहे. पुढील एक वर्ष देशाने संयम, शिस्त आणि संसाधन बचतीचा मार्ग स्वीकारण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

जगातील जवळपास २० टक्के तेलवाहतूक स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ मार्गातून होते. त्यामुळे या समुद्री मार्गावर थोडीशीही अस्थिरता निर्माण झाली, तरी त्याचा परिणाम थेट तेलाच्या किमतींवर होतो. युद्धामुळे जहाजांची वाहतूक धोक्यात येते, विमा खर्च वाढतो आणि तेलपुरवठा उशिरा पोहोचतो. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल महाग होते. भारताला अधिक डॉलर मोजून तेल खरेदी करावे लागते. परिणामी देशाच्या परकीय चलनसाठ्यावर ताण येतो आणि रुपयाची घसरण होण्याचा धोका वाढतो.

आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असला, तरी त्याची काही मोठी आर्थिक अवलंबित्वे अजूनही परदेशावर आहेत. विशेषतः पेट्रोलियम आणि सोन्याच्या आयातीवर भारताचा प्रचंड खर्च होतो. देशातील एकूण गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून आयात केले जाते. याचा अर्थ असा की, जगात कुठेही युद्ध झाले, तेल उत्पादक देशांमध्ये अस्थिरता निर्माण झाली किंवा डॉलर महाग झाला, तर त्याचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलचे दर वाढतात, वाहतूक खर्च वाढतो आणि शेवटी महागाई सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचते.

सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या युद्धाचा फटका भारताला बसताना दिसत आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधानांनी 'इंधन बचत' हा दिलेला मंत्र अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात इंधनाचा वापर अनेकदा गरजेपेक्षा प्रतिष्ठेचा भाग बनला आहे. काही किलोमीटर अंतरासाठीही चारचाकीचा वापर, वाहने सतत सुरू ठेवणे, अनावश्यक प्रवास, ट्रॅफिकमध्ये होणारी इंधनाची नासाडी या सर्व सवयी देशाच्या अर्थव्यवस्थेवर अतिरिक्त भार टाकतात. एका व्यक्तीने एक लिटर पेट्रोल वाचवले तर तो किरकोळ मुद्दा वाटू शकतो; पण १४० कोटी लोकसंख्येच्या देशात प्रत्येक नागरिकाने थोडी जरी बचत केली, तरी ती राष्ट्रीय पातळीवर मोठी आर्थिक शक्ती ठरू शकते.

पंतप्रधानांनी केलेले 'सोने खरेदी टाळा' हे आवाहनही तितकेच महत्त्वाचे आहे. भारतात सोने ही केवळ धातू नसून भावना, परंपरा आणि प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जाते. विवाहसोहळे, सण-उत्सव आणि गुंतवणूक अशा प्रत्येक ठिकाणी सोन्याला विशेष स्थान आहे. पण याच सवयीमुळे भारताला दरवर्षी प्रचंड प्रमाणात सोने आयात करावे लागते. यासाठी अब्जावधी डॉलर परदेशात जातात. परिणामी व्यापार तूट वाढते आणि रुपयावर दबाव येतो. याचा थेट परिणाम देशाच्या परकीय चलनसाठ्यावर होत असून सध्याच्या काळात असलेल्या युद्धजन्य परिस्थितीत ते परवडणारे नाही.

एकीकडे देशाला उद्योग, तंत्रज्ञान, संशोधन आणि पायाभूत सुविधांसाठी भांडवलाची गरज आहे; तर दुसरीकडे नागरिकांची मोठी बचत निष्क्रिय सोन्यात अडकते. सोने घरातील लॉकरमध्ये पडून राहते; ते उत्पादनक्षम अर्थव्यवस्थेत फारसा सहभाग देत नाही. जर हीच गुंतवणूक उद्योग, शेअर बाजार, स्टार्टअप्स किंवा बँकिंग व्यवस्थेत आली, तर रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. म्हणूनच सरकार वेळोवेळी 'सॉव्हरिन गोल्ड बॉण्ड' किंवा 'डिजिटल गोल्ड' यांसारखे पर्याय आणते.

पंतप्रधानांच्या आवाहनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे 'स्वावलंबन'. जागतिक संकटांच्या काळात प्रत्येक देश आपल्या हिताचे निर्णय घेतो. कोरोना महामारीच्या काळात जगाने पाहिले की, औषधे, लस, इंधन, अन्नधान्य आणि तंत्रज्ञान यासाठी परावलंबी असलेले देश किती अडचणीत आले. भारताने 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आणली. इंधन बचत, स्वदेशी उत्पादनांचा वापर आणि अनावश्यक आयात टाळणे हे त्याच धोरणाचे भाग आहेत.

आज भारत ऊर्जा क्षेत्रात मोठे बदल अनुभवत आहे. सौरऊर्जा, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन या क्षेत्रात भारताने मोठी पावले उचलली आहेत. पण हा बदल एका दिवसात होणार नाही. तोपर्यंत पारंपरिक इंधनावर अवलंबित्व कमी करण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक आहे.

अशा परिस्थितीत पंतप्रधानांनी केलेले 'वर्क फ्रॉम होम'चे आवाहन महत्त्वाचे ठरते. कोरोना काळात भारताने पाहिले की, अनेक क्षेत्रांमध्ये घरून काम करण्याची क्षमता आहे. आयटी, मीडिया, डिझाईन, प्रशासन, डिजिटल सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये कार्यालयीन प्रवास कमी झाला तर लाखो लिटर इंधनाची बचत होऊ शकते. प्रत्येक दिवशी लाखो वाहने रस्त्यावर कमी आली, तर केवळ पेट्रोल-डिझेलची बचतच होणार नाही, तर प्रदूषण आणि ट्रॅफिकची समस्याही कमी होईल.

या आवाहनांचे राजकारण होऊ शकते, टीकाही होऊ शकते; पण वास्तव नाकारता येत नाही. जागतिक पातळीवर आर्थिक युद्धे सुरू आहेत. डॉलर मजबूत होत आहे, तेलाचे दर अनिश्चित आहेत, आणि जागतिक बाजारपेठा अस्थिर आहेत. अशा वेळी भारताने आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम आणि शिस्तबद्ध होणे गरजेचे आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेची ताकद केवळ शेअर बाजाराच्या आकड्यांत नसते; ती नागरिकांच्या शिस्तीत, बचतीत आणि संसाधनांच्या योग्य वापरात असते. त्यामुळे इंधन बचतीपासून ते विवेकी गुंतवणुकीपर्यंत प्रत्येक छोटा निर्णय हा राष्ट्रनिर्मितीचा भाग ठरतो. आणि कदाचित म्हणूनच आजचे हे आवाहन भविष्यात भारताच्या आर्थिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखले जाऊ शकते.

युद्ध कधी संपेल याबाबत सध्या कोणतीही निश्चितता नाही. मध्यपूर्वेतील संघर्ष अनेकदा अपेक्षेपेक्षा अधिक काळ लांबतो आणि त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतात. त्यामुळे भारतानेही अल्पकालीन नव्हे, तर दीर्घकालीन तयारी करण्याची गरज आहे. ऊर्जा बचत ही आता पर्यावरणाचा विषय राहिलेली नाही; ती आर्थिक राष्ट्रवादाची गरज बनली आहे.

पंतप्रधानांचे आवाहन काहींना कठोर किंवा अतिशयोक्तीपूर्ण वाटू शकते; मात्र वास्तव अत्यंत गंभीर आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण वाढू नये, महागाई नियंत्रणात राहावी आणि परकीय चलनसाठा सुरक्षित राहावा, यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान देण्याची वेळ आली आहे.

# प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याचा निर्धार करूया : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

**बारामती :** नागरिकांचे आरोग्य चांगले राहिले तर देशाचे भविष्य उज्ज्वल राहील; यादृष्टीने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लोकाभिमुख आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाला नेहमीच बळ दिले आहे, त्यामुळे प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्याचा निर्धार करून आरोग्यदायी, सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

जिल्हा परिषदेच्यावतीने बारामती तालुक्यातील होळ येथे उभारण्यात आलेल्या मॉडेल प्राथमिक केंद्राचे लोकार्पण करण्यात आले तसेच यावेळी जिल्ह्यातील ४५ मॉडेल प्राथमिक केंद्राच्या दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, दिवंगत अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा परिषदेने साकारलेल्या विविध लोकोपयोगी आणि नाविन्यपूर्ण योजना आज संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'नासा-इस्रो भेट योजना', 'एकलमाता कल्याण योजना' सारख्या महत्त्वपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या अनेक योजनांची नोंद इतर राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांनी घेतली आहे, त्या संस्था आज आपल्या जिल्हा परिषदेशी संपर्क साधत आहेत, हे आपल्या कामाचे यश आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे जिल्हा परिषदेने आज एकाच वेळी, एकाच दिवशी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्ते ४५ मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्राचे अत्यंत साध्या पद्धतीने दूरदृष्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्याचे नियोजन केले, त्यामुळे अनावश्यक खर्चाला आळा बसला आहे, ही बाब स्तुत्य असून अनुकरणीय आहे.

**बारामतीला 'गर्भाशय मुखाचा कर्करोग मुक्त तालुका' करण्याचा निर्धार :**

विविध कंपन्यांच्या 'सीएसआर'च्या माध्यमातून 'सर्व्हायकल कॅन्सर फ्री बारामती फॉर मदर्स अँड डॉटर्स' या उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला असून ही केवळ आरोग्य मोहिम नसून माता-भगिनींच्या सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठीचा व्यापक पाया आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून बारामती तालुक्यातल्या ३० ते ६५ वयोगटातील प्रत्येक महिलांची मोफत एचपीव्ही डीएनए

**उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकाचवेळी ४५ मॉडेल प्राथमिक केंद्रांचे लोकार्पण**



तपासणी आणि ९ ते १४ वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीकरण उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक आई आणि मुलीला कॅन्सर विरोधी संरक्षण कवच देण्याचे ध्येय ठेवले आहे. आशा सेविका, आरोग्य कर्मचारी, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासनाच्या समन्वयातून हा उपक्रम गावागावात राबविला जाणार आहे. बारामतीला 'गर्भाशय मुखाचा कर्करोग मुक्त तालुका' करण्याचा निर्धार आहे.

**नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी**

प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असून याच विचारातून ङ्गमॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र ही संकल्पना पुढे आली आहे. पुणे जिल्हा हा आरोग्य सुविधांच्या दृष्टीने राज्यामध्ये नेहमीच आघाडीवर राहिला आहे. ग्रामीण आणि शहरी भागात व्यापक आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यरत आहे. मात्र बदलत्या काळानुसार ग्रामीण आरोग्य व्यवस्थाही आधुनिक आणि सक्षम होणे आवश्यक होते. त्यासाठीच 'मॉडेल पीएचसी' ही संकल्पना पुढे आली.

**ग्रामीण नागरिकांना शहरासमान दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध**

मॉडेल पीएचसीचे केंद्र हे आधुनिक सुविधा, प्रशिक्षित डॉक्टर, कुशल कर्मचारी, मातृत्व व बाल आरोग्य सेवा, रोग प्रतिबंध, जनजागृती आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर असलेले सर्वसमावेशक आरोग्य केंद्र आहे. या केंद्रामध्ये मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, डिजिटल हेल्थ मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम, सुसज्ज प्रसूती गृह, स्वच्छ आणि रुग्णाभिमुख वातावरण यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण नागरिकांना शहरासमान दर्जाची आरोग्य सेवा आता आपल्या गावातच मिळणार आहे.

आज पुणे जिल्ह्यात ११० पैकी ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रे मॉडेल पीएचसी प्रक्रियेत आहेत. त्यापैकी १९ केंद्रांचे अत्याधुनिक नूतनीकरण पूर्ण झाले असून ती पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. ७ केंद्रांची कामे प्रगतीपथावर असून लवकरच ती पूर्ण होतील. २९ केंद्रांमध्ये प्रसूतीगृह आणि शस्त्रक्रिया विभागांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या कामामध्ये 'सीएसआर'च्या माध्यमातून अनेक संस्थांनी मोलाचे योगदान दिलं आहे. 'बॉश इंडिया'ने आठ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी निधी उपलब्ध करून देत मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, प्रसूती गृह आणि अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिली आहे. भारत फोर्ज उद्योगसमूहाने होळ मॉडेल 'पीएचसी'साठी दोन कोटी रुपयांचा निधी दिला आहे.

नागरिकाला दर्जेदार आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी लक्षात घेता जिल्हा परिषदेने उचललेले हे पाऊल अत्यंत कौतुकास्पद आहे. ही आरोग्य चळवळ अधिक वेगाने आणि व्यापक स्वरूपात पुढे नेण्याची गरज आहे. होळ, मोरगाव आणि जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातल्या विविध ठिकाणी मॉडेल पीएचसी सेंटर उभारल्यामुळे नागरिकांना उपचारांसाठी शहरात जाण्याची गरज कमी होईल. पण ही केंद्रे उभारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच ती सक्रिय ठेवणे आणि त्यांचा योग्य वापर करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत सुधारणा व्हावी यासाठी अत्यंत महत्त्वाची पावले उचलली होती. मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र ही संकल्पनाही त्यांच्या प्रेरणेतूनच पुढे आली आहे. आरोग्य हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता.

कोरोनाच्या अत्यंत कठीण काळातही त्यांनी राज्याची अर्थव्यवस्था आणि आरोग्य व्यवस्था दोन्ही सक्षमपणे सांभाळली. त्या काळात पुणे जिल्ह्यातील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवत त्यांनी समन्वयासाठी नियमित बैठका घेतल्या. आरोग्य यंत्रणेला बळ दिलं आणि प्रत्येक नागरिकाला उपचार मिळावेत यासाठी रात्रंदिवस प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीतूनच बारामतीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय आणि शासकीय नर्सिंग कॉलेज उभे राहिले. लवकरच शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या भव्य आणि अत्याधुनिक नव्या इमारतीचे उद्घाटन होणार आहे. देशातील सर्वात सुंदर आणि आधुनिक वैद्यकीय शैक्षणिक संकुलांपैकी एक म्हणून ते ओळखले जाईल. याचबरोबर बारामतीमध्ये अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय उभारण्यात येणार आहे. असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

### वैश्विक ओळखपत्र काढण्यासाठी दिव्यांगांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ : मंत्री अतुल सावे

**मुंबई :** राज्य शासनाने विशेष सहाय्य अनुदान योजनांअंतर्गत लाभ घेणाऱ्या, परंतु वैश्विक ओळखपत्र नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा दिला आहे. अशा लाभार्थ्यांना वैश्विक ओळखपत्र काढण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या कालावधीत त्यांचे अनुदान सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी दिली.

मंत्री अतुल सावे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या निर्णयामुळे यूडीआयडी कार्ड नसलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांमध्ये दिव्यांग लाभार्थ्यांचाही समावेश असून, अलीकडे 'युडीआयडी' कार्ड अनिवार्य करण्यात आल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे अनुदान थांबले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत, १ एप्रिल २०२६ पूर्वी या योजनांचा लाभ घेणाऱ्या दिव्यांगांना मुदतवाढ दिली आहे. संबंधित तहसीलदारांनी जुन्या वैद्यकीय प्रमाणपत्र असलेल्या लाभार्थ्यांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत वैश्विक ओळखपत्र कार्ड मिळवून देण्यासाठी आवश्यक समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयात इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया सुरू

**तुळजापूर :** श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तुळजापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ११ वी वर्गाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने दिनांक १७ मे २०२६ ते २१ मे २०२६ (रात्री ११:५९ वाजेपर्यंत) या कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रवेशासाठी अर्ज शुल्क खुला, एसईबीसी व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३०० रु. तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या-विमुक्त जाती-जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी २०० रु. निश्चित करण्यात आले आहे. परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत २१ मे २०२६ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत राहणार आहे.



ऑफलाईन अर्ज विक्री व स्वीकृती ठिकाण श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय, तुळजापूर येथे आहे. तसेच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी https://sainikividyalayatuljapur.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाकडून पहिली गुणवत्ता यादी २३ मे २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार असून प्रथम गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया २६ मे २०२६ ते २९ जून २०२६ दरम्यान राबविण्यात येणार आहे.

प्रवेशासाठी वयोमर्यादेच्या निकषानुसार विद्यार्थ्यांचा जन्म १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २०११ दरम्यान असणे आवश्यक आहे.


विद्यालयात अनुभवी शिक्षकवृंद, एनडीए व एसएसबी तयारीसाठी निवृत्त सैन्य अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, विज्ञान शाखेसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा तसेच कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण सुविधा उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचा एसएससी फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

विद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी पर्यंत विज्ञान शाखेत शिक्षण घेणे बंधनकारक राहणार असून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी प्रवेशासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस प्रविष्ट होणे आवश्यक राहणार आहे.

अधिक माहितीसाठी ९४०३५३९०४४, ९९६०६१७००२ किंवा ७५८८९३८४९४ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने व प्राचार्य वैजनाथ घोडके यांनी केले आहे.

# जनगणना - २०२७ : घर सूचीकरणासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**धाराशिव :** जनगणना -२०२७ अंतर्गत घर सूचीकरण (House Listing) प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून, नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे.



जनगणना प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणकांकडून नागरिकांच्या घर सूचीकरणाची आवश्यक ती नोंद पूर्ण केली जाणार आहे. तसेच काही कारणास्तव नागरिकांना दिनांक १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वतः स्व-गणना (Self Enumeration) करणे शक्य झाले नसल्यास, अशा नागरिकांसाठी दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत.

यावेळी नागरिकांनी शासनाने निर्धारित केलेल्या जनगणनेशी संबंधित ३३ प्रश्नांची माहिती प्रगणकांना उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. या माहितीद्वारे संबंधित नागरिकांची नोंद जनगणनेच्या पोर्टलवर करण्यात येणार आहे.

घर सूचीकरण प्रक्रियेत इमारत व घर क्रमांक, घराचे स्थान, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग व प्रवर्ग, राहण्याच्या खोल्यांची संख्या, विवाहित जोडप्यांची संख्या, उपलब्ध सुविधा-सुविधा, मालमत्ता, साहित्य आदी विविध बाबींची माहिती विचारली जाणार आहे. या सर्व माहितीच्या आधारे घर सूचीकरणाचे काम डिजिटल स्वरूपात पूर्ण करण्यात येईल. जनगणना -२०२७ संदर्भातील नागरिकांची माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जनगणना -२०२७ च्या टप्पा क्रमांक १ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत होणाऱ्या घर सूचीकरण प्रक्रियेसाठी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती द्यावी आणि राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

धाराशिव जिल्हा घर सूचीकरणाच्या कामकाजात राज्यात अग्रस्थानी राहावा, यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

साप्ताहिक तेरणा वृत्तांत
हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र - ४१३५०९ येथे प्रकाशित केले. संपर्कासाठी : मो. ९९७५६५०३६३, इमेल - ternavruttant@gmail.com

Printed by Prasad Sanjay Pawar at Rajswa Printing Press, Budhwar Peth, Wadar Galli, Solapur, Dist. Solapur 413002, for the owner, publisher and editor Malhar Ranajagjitsingh Patil, published at Ter, near Narsingh Temple, Dharashiv, Maharashtra – 413509. RNI No. – MHMAR/25/A0338.

# बार्शीत गुटखा माफियावर आयपीएस अंजना कृष्णा यांची धडक कारवाई



ओंकार हिंगमिरे
बार्शी प्रतिनिधी

**बार्शी : शहर व तालुक्यात अनेक वर्षांपासून राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध गुटखा व्यवसायावर अखेर मोठी कारवाई करण्यात आली आहे. बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांनी स्वतः पुढाकार घेत बालाजी कॉलनी येथील गुटखा माफियाच्या गोडाऊनवर धडक छापा टाकत तब्बल तीन पिकअप भरून लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला. या कारवाईमुळे बार्शीतील अवैध व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून नागरिकांकडून या कारवाईचे जोरदार स्वागत करण्यात येत आहे.**

## तीन पिकअप भरून लाखो रुपयांचा गुटखा जप्त

बार्शी शहरातील पांडे चौक परिसरात ड्रायफ्रूट दुकानाच्या आडून दररोज लाखो रुपयांचा गुटखा व्यवसाय सुरू असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होती. याबाबत विविध माध्यमांतून वारंवार बातम्याही प्रकाशित होत होत्या. मात्र, मुख्य गुटखा माफियांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, मागील पंधरा दिवसांपूर्वी अतिरिक्त कार्यभार स्वीकारल्यानंतर आयपीएस अंजना कृष्णा यांनी शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांविरोधात कठोर




भूमिका घेतली आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर अनेक अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले असतानाही बालाजी कॉलनीतील गुटखा माफिया बिनधास्तपणे व्यवसाय सुरू ठेवत असल्याची माहिती समोर आली होती.

तरुणाईच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या अवैध धंद्याची माहिती मिळाल्यानंतर अंजना कृष्णा यांनी थेट गोडाऊनवर छापा टाकत मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केला. या कारवाईदरम्यान तीन पिकअप वाहनांमध्ये भरून लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला असून, रात्री उशिरापर्यंत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. तसेच सोलापूर येथून अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी बार्शीत दाखल झाले असून त्यांनी स्वतः फिर्यादी होत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली आहे.

आयपीएस अंजना कृष्णा यांच्या या धडक कारवाईचे सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात कौतुक होत आह बार्शी शहर व तालुक्यातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करणाऱ्या धाडसी पोलीस अधिकाऱ्याचीच कायमस्वरूपी गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

या कारवाईनंतर अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. यापूर्वी किरकोळ विक्रेते किंवा टपरीधारकांवर कारवाई होत असताना मुख्य गुटखा माफियांची नावे कारवाईतून वगळली जात असल्याची चर्चा होती. अनेकदा डमी आरोपी दाखवून प्रकरणे दडपण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोपही होत होते. मात्र, आयपीएस अंजना कृष्णा यांनी थेट मुख्य गुटखा माफियाच्या गोडाऊनवर कारवाई केल्याने बार्शीकरांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर कठोर गुन्हे दाखल करून गुटखा माफियाचे संपूर्ण जाळे उद्ध्वस्त करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.


---

# बार्शीत विजांचा कहर; अलीपूर येथे मेंढपाळासह तीन मेंढ्यांचा मृत्यू, खडकलगावात बैल ठार

**बार्शी :** शहर व तालुक्यात बुधवारी दि. १३ मे २०२६ रोजी दुपारनंतर अचानक वातावरणात मोठा बदल होऊन वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट आणि जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. अवघ्या काही मिनिटांत वातावरण ढगाळ बनले आणि अनेक भागांत मुसळधार पावसासह वीजांचा प्रचंड कडकडाट झाला. या नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली असून, शेतकरी वर्गालाही मोठा फटका बसला आहे.

दुपारी तीन वाजेपर्यंत बार्शी शहरात तब्बल ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होत होती. कडक उन्हामुळे नागरिक हैराण झाले होते. मात्र साडेतीनच्या सुमारास अचानक आकाशात काळे ढग दाटून आले आणि वातावरणात झपाट्याने बदल झाला. त्यानंतर बार्शी शहरासह अलीपूर, खडकलगाव, बेलगाव, ताडसौंदणे, आगळगाव परिसरात जोरदार वारे, पाऊस आणि वीजांच्या कडकडाटाने अक्षरशः धुमाकूळ घातला.

दरम्यान, बार्शी तालुक्यातील अलीपूर येथे अतिशय दुर्दैवी घटना घडली. अलीपूर येथील गट क्रमांक ५९ मध्ये दुपारी चारच्या सुमारास वादळी वारे व पावसादरम्यान अचानक वीज कोसळली. या दुर्घटनेत अमोल भीमराव माने (वय ३५, रा. नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) या मेंढपाळाचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्यासोबत असलेल्या तीन मेंढ्यांचाही मृत्यू झाला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, माने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर



कोसळला आहे.

याचदरम्यान खडकलगाव येथेही विजेच्या तडाख्यामुळे आणखी एक दुर्घटना घडली. शेतकरी गणपती पट्टू कोळेकर यांच्या गट क्रमांक १३४/२ मधील शेतात बांधलेल्या बैलावर वीज कोसळून बैलाचा जागीच मृत्यू झाला. सुदैवाने शेतकरी कोळेकर हे या दुर्घटनेतून बचावले; मात्र शेतीचा मुख्य आधार असलेला बैल गमावल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार या घटनेत सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. बार्शी तालुक्यातील या आपत्तीजनक घटनेची माहिती मिळताच तहसीलदार एफ. आर. शेख यांच्या आदेशानुसार महसूल प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देत पंचनामा प्रक्रिया सुरू केली. मृत मेंढपाळाच्या कुटुंबीयांना तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाकडून तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.




अवकाळी पाऊस, वाढते शेतीखर्च आणि सततच्या आर्थिक संकटामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही घटना मोठा धक्का मानली जात आहे. अचानक बदलणारे हवामान आणि वाढता विजांचा धोका पाहता नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# बार्शी तालुक्यात सरपंचपदाच्या आरक्षणाची नवी सोडत जाहीर

## २०२५ ते २०३० ग्रामपंचायत निवडणुकांसाठी १२९ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित

**बार्शी :** तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सरपंचपदाच्या आरक्षणाची बहुप्रतिक्षित सोडत बुधवार दि. १३ मे २०२६ रोजी पार पडली. जिल्हाधिकारी सोलापूर (ग्रामपंचायत शाखा) यांच्या आदेशानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. यापूर्वी दि. १५ जुलै २०२५ रोजी निश्चित करण्यात आलेले आरक्षण अधिक्रमित करून नव्याने सोडत प्रक्रिया राबविण्यात आल्याने तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

बार्शी तालुक्यातील एकूण १२९ ग्राम पंचायतींसाठी सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये अनुसूचित जातींसाठी ११, अनुसूचित जमातींसाठी १, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ३४ तर उर्वरित पदे सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. महिलांसाठी स्वतंत्र आरक्षणाचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचनेनुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी चिठ्ठीद्वारे सोडत प्रक्रिया पार पडली, तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी यापूर्वी निश्चित करण्यात आलेले आरक्षण कायम ठेवण्यात आले आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी वांगरवाडी, गौडगाव, मोडेगाव, मळेगाव आणि सावरगाव ही गावे राखीव करण्यात आली आहेत. तर जामगाव (पा), दडशिंगे, तांदुळवाडी, गोरमाळे, धामणगाव (आ) आणि दहिटणे या गावांचा समावेश अनुसूचित जाती महिला आरक्षणात करण्यात आला आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी शेलगाव (मा) हे गाव राखीव ठेवण्यात आले असून अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी यावेळी कोणतेही आरक्षण घोषित करण्यात आलेले नाही.

नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी खडकोणी, भानसळे, वाणेवाडी, घारी, कापशी, महागाव, पिंपळगाव (पानगाव), बोरगाव (झाडी), हळदुगे, मुंगशी (आर), रातंजन, ज्योतीबाचीवाडी, सुर्डी, पुरी, इले, उंबरगे तसेच हत्तीज, चिंचखोपन आणि हिंगणी (आर) या गावांचा समावेश करण्यात आला आहे. तर कोरेगाव, काटेगाव, भोयरे, चिंचोली–ढेंबरेवाडी, ममदापूर, अरणगाव, घाणेगाव, ढोराळे, मालेगाव, संगमनेर, तुळशीदासनगर, तडवळे, आंबेगाव, कारी, चिखर्डे, नांदणी आणि जामगाव (आ) या गावांचा समावेश नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला आरक्षणात करण्यात आला आहे. सर्वसाधारण प्रवर्गामध्येही मोठ्या प्रमाणात गावांचा समावेश करण्यात आला असून आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अनेक गावांमध्ये नव्या नेतृत्वाला संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून इच्छुक उमेदवारांकडून आतापासूनच तयारी आणि संपर्क मोहीम सुरू करण्यात आली आहे. आरक्षण जाहीर होताच गावागावांत राजकीय चर्चांना उधाण आले असून आगामी निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी नवे राजकीय समीकरणे पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

# 'नो व्हेईकल डे'चा राज्यात आदर्श; सोलापूर जिल्हा परिषद पर्यावरण रक्षणासाठी रस्त्यावर!

## अध्यक्ष दीपक वैद्य एसटीने तर उपाध्यक्ष इंद्रजीत पवार ईव्हीवरून झेडपीत दाखल होणार

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला सोलापूर जिल्हा परिषदेचा कृतीतून प्रतिसाद

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात एक अभिनव आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला असून, आता दर सोमवारी जिल्हा परिषदेत 'नो व्हेईकल डे' पाळला जाणार आहे. इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, या उपक्रमात सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. जागतिक तापमानवाढ, वाढते वायू प्रदूषण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन बचतीचे महत्त्व वाढले असून, त्यातूनच सोलापूर जिल्हा परिषदेकडून हा पुढाकार घेण्यात आला आहे.

या निर्णयानुसार प्रत्येक सोमवारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खाजगी दुचाकी, चारचाकी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळायचा आहे. त्याऐवजी एसटी, सार्वजनिक वाहतूक, सायकल, इलेक्ट्रिक वाहन किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

विशेष म्हणजे या उपक्रमात पदाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत आदर्श निर्माण केला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य हे बार्शीहून एसटी बसने प्रवास करून जिल्हा परिषदेत येणार आहेत, तर उपाध्यक्ष इंद्रजीत पवार हे जुळे सोलापुरातून ईव्ही स्कूटरद्वारे कार्यालयात दाखल होणार आहेत. त्यामुळे 'नो व्हेईकल डे' हा उपक्रम केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरल्याची चर्चा सुरू झाली आहे.

यापूर्वीही जिल्हा परिषदेत अशा प्रकारचा प्रयोग करण्यात आला होता. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सायकलवरून जिल्हा परिषदेत आले होते आणि त्या उपक्रमाची राज्यभर चर्चा झाली होती.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत काम करणारे सर्व कर्मचारी देशहितासाठी छोटेखानी योगदान देत असल्याचा विश्वास अध्यक्ष दीपक वैद्य यांनी व्यक्त केला. राज्यात प्रभावीपणे 'नो व्हेईकल डे' राबवणारी सोलापूर जिल्हा परिषद ही पहिली संस्था ठरत असल्याचेही सांगण्यात आले.

---

# दुष्काळाच्या छायेत आशेचा झरा

## 'जलतारा'मुळे धाराशिवमध्ये उगवतेय नवजीवनाची पहाट

**धाराशिव:** धाराशिवच्या मातीत दुष्काळ नवा नाहीः उन्हाळ्याची चाहूल लागली की गावागावातील विहिरींचा तळ दिसू लागतो, बोअरवेल कोरड्या पडतात, टँकरच्या पाण्यासाठी रांगा लागतात आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पुन्हा एकदा चिंतेचे ढग दाटू लागतात. आकाशात ढग दाटले तरी पाऊस हमखास पडेल याची शाश्वती उरलेली नाही. बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान आणि वर्षानुवर्षे घटत चाललेली भूजल पातळी यामुळे धाराशिवसारख्या दुष्काळी जिल्ह्यासमोर जलसंकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे.

अशा परिस्थितीत जलतारा अभियान हे केवळ प्रशासनाचे अभियान न राहता आशेचा नवा किरण ठरत आहे. कारण ही मोहीम फक्त पाणी अडविण्याची नाही, तर भविष्य वाचविण्याची आहे. पुढील पिढ्यांच्या अस्तित्वासाठी उभा राहिलेला सामूहिक संकल्प आहे. पाणी म्हणजे केवळ तहान भागविणारे साधन नाही; ते शेतीचे जीवन, जनावरांचा आधार, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आणि पर्यावरणाचा श्वास आहे. म्हणूनच आज पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना घोषणांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे. जलतारा अभियानातून धाराशिव जिल्ह्यात हीच जाणीव लोकांच्या मनामनात रुजताना दिसत आहे.

गावोगावी तलाव, नाले, ओढे, विहिरी आणि शेततळ्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. गाळ काढणे, नाले खोलीकरण, बंधारे उभारणे, वृक्षारोपण, जलस्रोत स्वच्छता आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपक्रमांमुळे अनेक गावांमध्ये सकारात्मक बदल जाणवू लागले आहेत. ज्या विहिरी काही वर्षांपूर्वी एप्रिलमध्येच कोरड्या पडत होत्या, त्या आता अधिक काळ पाण्याने भरलेल्या राहू लागल्या आहेत. काही भागांत भूजल पातळी वाढल्याचेही चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे या अभियानाने दुष्काळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. पूर्वी पाणीटंचाई आली की फक्त शासनाकडे मदतीची अपेक्षा ठेवली जात होती; मात्र आता गावकरी स्वतः पुढाकार घेत जलसंधारणाच्या कामांत उतरू



लागले आहेत. युवकांचे श्रमदान, महिला बचत गटांचा सहभाग, शेतकऱ्यांचे नियोजन आणि सामाजिक संस्थांची साथ यामुळे जलतारा आता लोकचळवळ बनू लागले आहे.

धाराशिवसारख्या जिल्ह्यासाठी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. कारण येथील शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा आधार भूजलावरच आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरले तरच विहिरी आणि बोअरवेल जिवंत राहू शकतात. त्यामुळे पडणारा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे ही आता निवड नसून अपरिहार्यता बनली आहे.

या मोहिमेला अधिक बळ मिळत आहे ते प्रशासन, लोकसहभाग आणि सेवाभावी संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी एक लाख जलतारा तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प जिल्ह्यासमोर ठेवला आहे. प्रत्येक शेतकरी उत्पादक कंपनी आणि शेतकरी गटाला प्रत्येकी ५०० जलधारा कामांचे उद्दिष्ट देण्यात आले असून, गावागावात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अभियानात नाम फाउंडेशनसह विविध सामाजिक संस्था सक्रियपणे सहभागी झाल्या आहेत. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून जलतारा कामांसाठी आवश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना वेग मिळत असून, भविष्यात जिल्ह्यातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात वाढण्याची आशा निर्माण झाली आहे. त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे.

आजही अनेक शेतकरी अपुऱ्या पाण्यामुळे पिकांचे नुकसान सहन करत आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो. अशा वेळी जलसंधारणाची प्रत्येक कृती उद्याच्या संकटावर मात करण्याची ताकद ठेवते. कारण जिथे पाणी टिकते, तिथे शेती टिकते; शेती टिकली की गावाची अर्थव्यवस्था टिकते आणि गाव टिकले की भविष्य सुरक्षित राहते.

जलतारा अभियानाची खरी ताकद म्हणजे त्यातून निर्माण होणारी सामाजिक जाणीव. हे अभियान केवळ जलस्रोत दुरुस्त करण्यापुरते मर्यादित नाही, तर पाण्याबाबत जबाबदारीची संस्कृती निर्माण करत आहे. घरगुती वापरापासून शेतीपर्यंत पाण्याचा योग्य वापर,पुनर्वापर आणि बचत याबाबत समाजात जागरूकता निर्माण होत आहे.

धाराशिवला दुष्काळमुक्त आणि जलसंपन्न बनवायचे असेल, तर जलतारा ही फक्त मोहीम न राहता लोकांच्या मनातील चळवळ बनली पाहिजे. शासन, प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिक यांनी हातात हात घालून पुढे आले, तर दुष्काळावर मात करणे अशक्य नाही. कारण आज जपलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करणार आहे आणि कदाचित याच थेंबांतून धाराशिवच्या नव्या समृद्धीची पहाट उगवणार आहे.

# केंद्र सरकारच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांवर फेरपरीक्षेचे संकट : डॉ.स्मिता शहापूरकर

**धाराशिव :** देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित असलेली 'नीट' परीक्षा रद्द करण्याचा निर्णय हा केंद्र सरकारच्या निष्काळजी, बेजबाबदार आणि अपयशी कारभाराचे प्रतीक आहे. 'नीट' पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच विद्यार्थ्यांना मानसिक व शैक्षणिक दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी मागणी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कडे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर यांनी केली आहे.

डॉ. शहापूरकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'नॅशनल टेस्टिंग एजन्सीने २०२६ ची नीट परीक्षा रद्द करून देशातील २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ मांडला आहे. मागील १२ वर्षांपासून देशातील विविध स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियांमध्ये पेपरफुटी, गैरव्यवहार आणि शिक्षण घोटाळ्यांच्या घटना सातत्याने समोर येत आहेत.'

### विद्यार्थ्यांसाठी विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात

मध्य प्रदेशातील व्यापम घोटाळ्यापासून ते नुकत्याच समोर आलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिका गळतीपर्यंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारे प्रकार घडत असूनही केंद्र सरकारकडून कोणतीही ठोस आणि प्रभावी कारवाई होताना दिसत नाही. परीक्षा रद्द करण्यापलीकडे सरकार काहीच करत नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या या भ्रष्ट साखळीमागील शिक्षण माफियांना कायद्याच्या चौकटीत उभे करण्याऐवजी त्यांना पाठीशी घालण्याचे काम केंद्र सरकार करत आहे. लाखो विद्यार्थ्यांनी दिवस-रात्र मेहनत घेऊन, मानसिक ताण सहन करून परीक्षा दिली. पालकांनी आर्थिक अडचणी झेलत मुलांच्या शिक्षणासाठी खर्च केला. मात्र एका निर्णयामुळे विद्यार्थ्यांवर पुन्हा परीक्षेचे ओझे टाकण्यात आले आहे, असे डॉ. स्मिता शहापूरकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# छत्रपती संभाजी महाराजांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**धाराशिव :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने १४ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी



स्वाती शेंडे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनीही महाराजांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

# ठाकरे सरकारचे ‘पाप’; कैलास पाटलांचा कांगावा

## स्वतःची निष्क्रियता लपवण्यासाठी शेतकरी हिताची नौटंकी : ऍड नितीन भोसले

**मुंबई :** सन २०२० च्या खरीप पीकविम्यासाठी जिल्ह्यातील हजारो शेतकरी तब्बल सहा वर्षांपासून न्यायासाठी वणवण भटकत असताना, आता अचानक शेतकऱ्यांचा कैवारी असल्याचा आव आणणारे आमदार कैलास पाटील हे केवळ राजकीय नौटंकी करत आहेत. प्रत्यक्षात २०२० आणि २०२१ चा पीकविमा रखडण्यामागे तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारची विमा कंपन्यांप्रती असलेली संशयास्पद मवाळ भूमिका कारणीभूत होती, ठाकरे सरकारचे ते ‘पाप’ झाकण्यासाठी कैलास पाटलांचा केविलवाणा कांगावा सुरू असल्याचा खरमरीत समाचार भाजपचे जिल्हा प्रवक्ते ॲड नितीन भोसले यांनी घेतला आहे.

विमा कंपन्यांसमोर ठाकरे सरकार इतके लाचार का होते? याचे उत्तर कैलास पाटलांनी अगोदर द्यावे. २०२० च्या पीकविम्याचा प्रश्न सोडवण्यासाठी तत्कालीन सरकारने विमा कंपन्यांसोबत ठोस बैठक घेण्याचे साधे धाडसही दाखवले नाही. परिणामी, शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा वर्षानुवर्षे अडकून पडला. विशेष म्हणजे, महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप २०२३ च्या विम्याचा प्रश्न नोव्हेंबर महिन्यांतच मार्गी लावण्यासाठी आक्रमक पावले उचलली व विमा वितरीत देखील झाला.

मग अडीच वर्षे सत्तेत राहून ठाकरे सरकारला हे का जमले नाही? विमा कंपन्यांना अभय देण्यामागे कोणाचे हितसंबंध दडले होते? असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे, त्या काळात सत्तेत सहभागी असलेले कैलास पाटील यांनी एकदाही विमा कंपन्यांविरोधात आवाज उठवला नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरण्याऐवजी त्यांनी मौन बाळगले. आता सत्तेबाहेर गेल्यानंतर अचानक शेतकऱ्यांच्या नावाने गळे काढणे म्हणजे निव्वळ राजकीय स्टंटबाजी असल्याची सडेतोड टीकाही भोसले यांनी केली आहे.

ठाकरे सरकारच्या नाकर्तेपणामुळेच प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेण्याऐवजी तत्कालीन सरकारने विमा कंपन्यांचेच हित जपल्याचा दावा भोसले यांनी केला आहे. त्यामुळेच हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनत गेला आणि अखेर सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. शेतकऱ्यांना न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ कुणामुळे आणि का आली, याचे उत्तर ठाकरे सरकार आणि त्यावेळच्या सत्ताधारी आमदार, खासदारांनी द्यायला हवे, अशी म ागणीही ॲड भोसले यांनी केली आहे. आमदार कैलास पाटील यांनी ना उद्धव ठाकरे यांना जाब विचारला, ना शेतकऱ्यांसाठी प्रभावी कायदेशीर लढाई उभी केली. त्यामुळे त्यांची आजची भूमि का ही ‌ढोंगी सहानुभूती‌ असल्याची भावना जिल्ह्यातील शेतकरी व्यक्त करत असल्याचेही भोसले यांनी म्हटले आहे.

## राणादादांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा; श्रेय लाटण्यासाठी विरोधकांची धडपड

दुसरीकडे, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा केला आहे. महायुती सरकारने या प्रकरणासाठी ॲड.धोर्डे-पाटील यांच्यासारखे अनुभवी कायदेतज्ज्ञ मैदानात उतरवले, तर केंद्र सरकारच्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल बलबीरसिंग यांनीही न्यायालयात शेतकऱ्यांची बाजू भक्कमपणे मांडली. आता अंतिम सुनावणी जवळ आली असून शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

स्वतःच्या निष्क्रियतेचे पाप झाकण्यासाठी आणि जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी कैलास पाटील केविलवाणा कांगावा करत आहेत. आमदार कैलास पाटील यांना शेतकरी बांधवांप्रति एवढा कळवळा असेल तर त्यांनी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या मनात असलेल्या प्रश्नांची अगोदर उत्तरे द्यावीत. तत्कालीन ठाकरे सरकारने विमा कंपन्यांसोबत निर्णायक बैठक का घेतली नाही? शेतकऱ्यांचे हजारो कोटी अडकवणाऱ्या कंपन्यांना राजकीय संरक्षण कोण देत होते? अडीच वर्षे सत्तेत असताना मूग गिळून गप्प बसलेले आपण निर्णय समीप आल्यावर आता अचानक आक्रमक का झालात? जिल्ह्यातील संतप्त शेतकरी आता स्पष्टपणे बोलू लागले आहेत की, आधी आपल्या निष्क्रियतेची कबुली द्या, मगच शेतकऱ्यांच्या हिताच्या गप्पा मारा! असे आव्हानही ॲड भोसले यांनी दिले आह

# कांदा उत्पादकांना तातडीचा दिलासा देऊन पर्यायी पीक धोरण राबवावे

## आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**धाराशिव : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या गंभीर आर्थिक संकटात सापडले असून त्यांना तातडीने दिलासा देण्याबरोबरच पर्यायी पीक धोरण राबविण्याची आवश्यकता असल्याची मागणी भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना सविस्तर पत्र पाठवून आपल्या भावना कळिवल्या आहेत. राज्यात वाढते तापमान, अवकाळी पाऊस, वादळे आणि बाजारातील घसरलेले दर यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.**

साठवणुकीतील कांदा खराब होणे, भिजून सडणे तसेच बाजारात अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सध्या बाजारात कांद्याला केवळ ४५० ते ५५० रुपये प्रति क्विंटल एवढाच दर मिळत असून उत्पादन खर्च, वाहतूक, मजुरी आणि साठवणूक खर्च लक्षात घेता हा दर परवडणारा नसल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे केवळ तात्पुरते अनुदान देऊन प्रश्न सुटणार नसून दीर्घकालीन शाश्वत उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक कांदा उत्पादन करणारे राज्य असून राज्यात दरवर्षी १२ ते १३ दशलक्ष मेट्रिक टन कांदा उत्पादन होते. देशाच्या एकूण उत्पादनात महाराष्ट्राचा सुमारे ३५ ते ४० टक्के वाटा आहे. त्यामुळे राज्यातील उत्पादन वाढले की बाजारात



अतिरिक्त पुरवठा होऊन कांद्याचे दर कोसळतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने नुकतेच जाहीर केलेल्या ‘महाराष्ट्र राज्य संपीडित जैववायू (CBG$) धोरण २०२६’चा आधार घेत अतिरिक्त कांदा उत्पादन क्षेत्रातील शेतकऱ्यांना नेपियर गवत आणि इतर जैवऊर्जा पिकांकडे वळिवण्यासाठी स्वतंत्र पीक विविधिकरण योजना राबवावी, अशी मागणीही पत्रात करण्यात आली आहे.

नेपियर गवताच्या लागवडीचा खर्च तुलनेने कमी असून वर्षातून पाच ते सात वेळा कापणी होत असल्याने शेतकऱ्यांना चांगले वार्षिक उत्पन्न मिळू शकते. याशिवाय नेपियरपासून जैववायू निर्मिती शक्य असून पशुखाद्य म्हणूनही त्याला मोठी मागणी असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. उइꭱ प्रकल्पांशी संलग्न करार शेती मॉडेल विकसित केल्यास शेतकऱ्यांना हमी बाजारपेठ उपलब्ध होईल आणि अतिरिक्त कांदा उत्पादनाचा ताण कमी होऊन बाजारभाव स्थिर राहण्यास मदत होईल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केला. दरम्यान, कांदा उत्पादकांना तातडीने अनुदान जाहीर करावे तसेच नेपियर गवत व इतर जैवऊर्जा पिकांसाठी अनुदान, प्रशिक्षण आणि करार शेती धोरण लागू करावे, अशी मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे.

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

## चौघांवर गुन्हा दाखल

**धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथे सासरच्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून २४ वर्षीय विवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पतीसह चौघांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आशा आकाश शेगर (वय २४, रा. येडोळा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. १० मे २०२६ रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली.

याप्रकरणी दाखल फिर्यादीत नमूद केल्यानुसार, मार्च २०२२ पासून आरोपी आकाश दत्ता शेगर, चांगुणाबाई दत्ता शेगर, भाग्यश्री दिलीप चव्हाण आणि तात्याराव राजाराम चव्हाण (सर्व रा. येडोळा, ता. तुळजापूर) यांनी मयत आशा हिला तु काळी आहेस, आम्हाला आवडत नाहीस, तू तुझ्या घरी जा, आम्हाला तुला नांदवायचे नाही, असे म्हणत वारंवार शिवीगाळ व मारहाण करून मानसिक आणि शारीरिक छळ केला.

या सततच्या त्रासाला कंटाळून आशा हिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी दत्ता देवराव चव्हाण (वय ५२, रा. येडोळा, ता. तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ८०, ८५, १०८ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

धाराशिव : भरधाव टिप्परने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना धाराशिव शहरातील बीड-तुळजापूर महामार्गावरील उड्डाण पुलावर घडली. या प्रकरणी टिप्पर चालकाविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ देविदास बेशकराव (वय २२, रा. कास्ती बु., ता. लोहारा, जि. धाराशिव) हे दि. ६ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एमएच २५ बीडी ८२४२ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून जात होते. दरम्यान, आयुर्वेदिक कॉलेजसमोरील बीड ते तुळजापूर जाणाऱ्या महामार्गावरील उड्डाण पुलावर एमएच २५ एजे ७१५३ क्रमांकाच्या टिप्पर चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवत सौरभ यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात सौरभ बेशकराव हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मयताचे वडील देविदास बाबुराव बेशकराव (वय ४५, रा. कास्ती बु., ता. लोहारा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६, २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४ व १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# रिव्हॉल्वरचा धाक दाखवून घाबरवणाऱ्यावर गुन्हा दाखल

**धाराशिव :** वाशी तालुक्यातील पार्डी फाटा येथे रिव्हॉल्वरचा धाक दाखवून नागरिकांना घाबरवल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सचिन पांडुरंग आठरे (रा. अध्या संकल्प सोसायटी, गायकवाड नगर, दिघी, हवेली, जि. पुणे) यांनी दि. १० मे २०२६ रोजी रात्री सुमारे १०.१५ ते १०.३० वाजण्याच्या दरम्यान पार्डी फाटा येथील कैलास भोसले यांच्या हॉटेलसमोर दारूच्या नशेत गोंधळ घातला.

यावेळी आरोपीने त्याच्याकडील रिव्हॉल्वरचा धाक दाखवत फिर्यादी सिद्धार्थ मच्छिंद्रनाथ मोरे (वय २१, रा. पार्डी, ता. वाशी, जि. धाराशिव) तसेच परिसरातील इतर नागरिकांना घाबरवून परिसरातील शांततेचा भंग केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी सिद्धार्थ मोरे यांनी दि. १२ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२), १२५ तसेच आर्म ॲक्ट कलम ३० आणि मद्यनिषेध कायदा कलम ८५(१) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास वाशी पोलीस करत आहेत.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर खर्चावर नियंत्रण

**मुंबई :** देश सध्या कठीण परिस्थितीतून जात असताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत सांस्कृतिक कार्य तथा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी यंदाच्या फ्रान्स येथील कान्स फिल्म फेस्टिव्हलला न जाण्याचा निर्णय घेतला आहे.

सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार यांनी सांगितले की, कठीण काळात देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देत विभागीय खर्चांवर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अधिकाधिक बैठका व्हर्च्युअल माध्यमातून घेण्यात येणार असून संसाधनांचा मर्यादित वापर करण्यावर भर दिला जाणार आहे.



दरम्यान, कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होणाऱ्या मराठी चित्रपट तसेच त्यासंदर्भातील आवश्यक समन्वय आणि सहकार्यासाठी संबंधित यंत्रणा नियोजित पद्धतीने कार्यरत राहतील, तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्यासाठी जिथे आवश्यकता असेल तिथे ऑनलाईन सहभागी होईन, असेही सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

# धाराशिव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या सरपंच आरक्षणाची सोडत १८ मे रोजी

**धाराशिव :** धाराशिव : धाराशिव तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत रविवार, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, धाराशिव येथे काढण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दि. ८ मे २०२६ रोजी दिलेल्या सूचनेनुसार ही आरक्षण सोडत ड्रॉ लॉटस पद्धतीने पार पडणार आहे. यापूर्वी दि. १० जुलै २०२५ रोजी तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली होती.

यावेळी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या ग्रामपंचायत सरपंच पदांमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही. मात्र ना.मा. प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील सरपंच पदांच्या जागा निश्चित करून त्या-त्या प्रवर्गासाठी आरक्षणाची सोडत त्याच दिवशी काढण्यात येणार आहे.

या प्रक्रियेसाठी धाराशिव तालुक्यातील संबंधितांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीत हजारो प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा; कोट्यवधी रुपयांची वसुली

**धाराशिव : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार ९ मे २०२६ रोजी जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. धाराशिव मुख्यालय येथे सकाळी ठिक १०.३० वाजता लोकअदालतीच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. यावेळी श्रीमती अभिश्री देव, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, श्री.एस.जी.ठुबे, जिल्हा न्यायाधीश-३,श्री.आर.के. खोमणे, जिल्हा न्यायाधीश-४,श्रीमती भाग्यश्री पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तसेच इतर न्यायाधीश यांच्या उपस्थितीत लोकअदालतींची सुरुवात झाली. या लोकअदालतीसाठी एकूण ९ पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती.**

## धनादेश, मोटार अपघात, बँक व पाणीपट्टी प्रकरणांत मोठी वसुली

### नागरिकांना जलद न्यायाचा दिलासा

९ मे रोजी झालेल्या जिल्हास्तरीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित एकूण ७,०४५ तर दावापूर्व प्रलंबित ९,३०९ अशी एकूण हजारो प्रकरणे सामोपचाराने मिटविण्यासाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित २९१ आणि दावापूर्व २,४२८ प्रकरणे तडजोडीअंती निकाली काढण्यात आली.

या लोकअदालतीमध्ये विविध प्रकारच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वसुली करण्यात आली. धनादेश प्रकरणांमध्ये फिर्यादी पक्षाला तब्बल रुपये १ कोटी १९ लक्ष ४९ हजार ८४ हजार इतकी रक्कम प्राप्त झाली. प्रलंबित मोटार अपघात नुकसानभरपाई प्रकरणांत रुपये १ कोटी ७४ लक्ष ५ हजार इतकी भरपाई देण्यात आली. तसेच प्रलंबित दिवाणी स्वरूपाच्या प्रकरणांत १ कोटी ६८ लक्ष ८६ हजार




५२६ रुपये रकमेचा निपटारा करण्यात आला.

याशिवाय बँकांच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये रुपये २८ लक्ष ९२ हजार ७६७ रुपये तर बँकांच्या वादपूर्व प्रकरणांमध्ये रुपये ४७ लक्ष २४ हजार ८९ रुपये इतकी वसुली करण्यात आली. नगरपालिका व ग्रामपंचायतींच्या पाणीपट्टी व घरपट्टी प्रकरणांमध्ये रुपये ९५ लक्ष २० हजार ७९२ रुपये रकमेची वसुली झाली. विद्युत वितरण प्रकरणांमध्ये रुपये १४ लक्ष ९९ हजार २३५ रुपये तर ग्राहक मंचाच्या प्रकरणांमध्ये रुपये १५ लक्ष रुपये रकमेचा निपटारा करण्यात आला. तसेच गुन्हा कबुलीच्या प्रकरणांमध्ये ८६ हजार ५०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला.

राष्ट्रीय लोकअदालतीमुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद, सुलभ आणि कमी खर्चात न्याय मिळण्यास मोठी मदत होत असून, सामोपचाराने वाद मिटविण्याच्या प्रक्रियेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.